*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक ९८१/२०१९/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. विलास शंकर ढमढेरे, रा. बिल्डींग आय-९, न्यु मुन्सिपल वसाहत, श्रीकृष्ण चौक, कुर्ला (प) मुंबई-४०००७०. | नायब तहसिलदार (अपिल शाखा), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग नाशिक, ता. जि. नाशिक. | सहायक आयुक्त (प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग नाशिक,ता. जि. नाशिक. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक** – ०१/१२/२०२३

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १७/०९/२०१८ | --------- | १५/१०/२०१८ | २९/१०/२०१८ | ------ | २०/११/२०१८ |

अपिलार्थी यांनी दि. ०१/०३/२०१९ रोजीच्या अर्जान्वये " मागितलेली माहिती पुरविता आली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपील अर्जाद्वारे कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित असून अन्य सर्व पक्षकार अनुपस्थित आहेत.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

कौठा गट नं. २५१, ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर अपर आयुक्त नाशिक याचेकडील रिव्हीजन क्र. २६१/२००० ची प्रत आणि श्री किसन शंकर पवार मु. पो. दौंड, जि. पुणे. यांचा दि. ११/०३/२००७ रोजीच्या अर्जाची प्रत. अपर आयुक्त नाशिक रिव्हीजन क्र.२००० ची प्रत आणि श्री किसन शंकर पवार यांचा दि. ११/०३/२००७ चा अर्जाची प्रत.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये 'माहिती प्राप्त झालेली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तीवादावरून असे दिसून येते की,

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अपिल शाखा), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १५/१०/२०१८ रोजीच्या

पत्रान्वये मागणी केलेली माहिती क्र. आरटीएस/पुनरीक्षण/२६१/२०००, दि. ०४/१०/२००१ ची मुळ संचिका मा. कार्यासन अधिकारी, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे अधिकार/अभिलेख/अ.नगर/५०७६१/२००८, दि. ३१/१२/२००८ (जा.क्र.५७४९२/२००८) अन्वये पाठविण्यात आलेली आहे. त्यामुळे आपण मागणी केलेल्या प्रती आपणास पुरविता येत नाही.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त (प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी अपिलार्थी यांच्या दि. २९/१०/२०१८ रोजी दाखल केलेल्या अपीलावर दि. १९/११/२०१८ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारीत केल्याचे दिसून येते. सदर सुनावणीवेळी अर्जदाराने तोंडी युक्तीवाद केल्याचे रोजनामा पाहता दिसून येते. त्यानुसार तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराचा माहिती अधिकार अर्ज अमान्य करण्यात येत असून आरटीएस/पुनरीक्षण क्र. २६१/२०२० ही संचिका उपलब्ध नसल्याने अर्जदार यांना माहिती पुरविता येत नाही. सदर संचिका मा. कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई येथे पाठविण्यात आल्याबाबत घेण्यात आलेल्या नोंदीची प्रत सही शिक्क्यानिशी अर्जदार यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. असे आदेशित करुन प्रथम अपिल अर्ज निकाली काढला आहे.

३) सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि.१७/०९/२०१८ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. १५/१०/२०१८ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना वस्तुस्थिती कळविलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिल अर्जावर सुनावणी घेऊन आदेश पारीत केल्याचे दिसून येते.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अपिल शाखा), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासुन १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७/०९/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.
२. प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ९८१/२०१९/नाशिक निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र. आ-३२०९ 30 OCT 2024